
# इंटरनॅशनल बुक सर्व्हिस नव्या रूपात

## वाचकांच्या सेवेत रविवारपासून पुन्हा रुजू; तंत्रज्ञानाचा 'टच' मिळणार

**संतोष शेणई :** सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २५ : पुण्यातील सांस्कृतिक केंद्र म्हणून एकेकाळी गजबजलेले 'इंटरनॅशनल बुक सर्व्हिस' हे पुस्तकांचे दुकान पुन्हा कात टाकून नव्या स्वरूपात रविवारपासून (ता. १ मार्च) सुरू होत आहे. 'अनौपचारिक वाचनालय' ही या पुस्तक विक्री केंद्राची जुनी ओळख नव्या स्वरूपातही जपली जाणार आहे. इंग्रजीबरोबरच मराठी पुस्तकांनाही येथे स्थान मिळणार आहे.

डेक्कन जिमखान्यावरचे हे दुकान एकेकाळी जगभरच्या उत्तम ग्रंथांसाठी प्रसिद्ध होते. विठ्ठलराव दीक्षित या पुस्तकवेड्या व्यक्तीने दहा हजार रुपये कर्ज घेऊन हे दुकान १९३१ मध्ये सुरू केले. पंडित नेहरूंनी येथून संदर्भग्रंथ मागवून घेतले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुण्याला आले की, त्यांची पहिली भेट याच दुकानाला असे. पुण्यातील एक सांस्कृतिक स्थान म्हणून




**डेक्कन : 'इंटरनॅशनल बुक सर्व्हिस' हे पुस्तकाचे दुकान रविवारी (ता. १) नव्या स्वरूपात पुस्तकप्रेमींना भेटणार.**

या दुकानाची ओळख होती. मात्र, गेल्या काही वर्षांत नव्या काळानुसार बदलणे या दुकानाला शक्य झाले नाही आणि व्यावहारिक जगात त्याची पीछेहाट होत गेली. त्यामुळे पुण्यातील अन्य जुन्या दुकानांप्रमाणे हेही दुकान बंद होणार की काय, याविषयी पुस्तकप्रेमींमध्ये चर्चा होत असतानाच हे दुकान मरगळ झटकून 'बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिस' या नव्या आधुनिक रूपात भेटणार आहे. मात्र, या दुकानाची जुनी वैशिष्ट्येही जपली जातील, असे या दुकानाचे नवे भागीदार मंदार जोगळेकर यांनी सांगितले.

जोगळेकर म्हणाले, ''या दुकानात आता तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. त्यामुळे ते तरुणाईलाही आकर्षित करेल. मात्र, जुन्या पुस्तकप्रेमींनाही ते आपलेसे वाटावे अशी त्याची रचना असेल. जुन्या फर्निचरचा योग्य वापर करून दुकानाला थोडा नॉस्टॉल्जिक टच दिला आहे. या दुकानात काही विशिष्ट कोपऱ्यात विशिष्ट विषयांची पुस्तके असत, ती आता नव्या स्वरूपातही तेथेच मिळतील; पण त्याचबरोबर एखादे पुस्तक नेमके कुठे असेल हे तंत्रज्ञानाच्या साहाय्याने काउंटरवरही सांगता येईल.''

'पुस्तके हाताळा, खुशाल वाचत बसा आणि आवडले तर खरेदी करा,' असे सुचवणारे हे दुकान होते. हे स्वरूप कायम राखणार आहे. दुकान आठवड्याचे सातही दिवस सकाळी सात ते रात्री नऊ या वेळेत खुले राहील. रस्त्यावरून जाणाऱ्याला डिजिटल फलकावर बदलत जाणारी पुस्तकांची मुखपृष्ठे दिसतील, तर दुकानात पुस्तके हाताळता येतील. काही पुस्तके संगणकावर डिजिटल स्वरूपात असल्याने ती तेथे वाचत बसता येतील.